नि.दि.दावा क्र.१८७/२०२१
संतोष शेंडे **वि.** शिवराज शिंदे व इतर

**निशाणी क्र.३० वरील आदेश**
**(आदेश दि.०६/०१/२०२५)**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (संक्षिप्तरित्या "दि.प्र.सं.") चे आदेश २६ नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करण्यासाठी सादर केला आहे.

०२. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. दावा मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी यांच्यादरम्यान वाद आहे. प्रतिवादींनी त्यांचा गट क्र.७४०/२/अ/३ या प्लॉटची हद्द ही जुन्या कुरुल रस्त्याचे मध्यापासून ९० फुट अंतरावर सुरु होते असे सांगून त्यानुसार जुन्या कुरुल रस्त्याचे मध्यापासून २२० फुट अंतरापर्यत गट क्र.७४०/२/अ/३ या प्लॉटची हद्दी असल्याचे कथन केले आहे. अशा परिस्थितीत गट क्र.७४०/२/अ/२, ७४०/२/अ/३, ७४०/२/अ/२, ७४०/२/अ/३ आणि ७४०/२/अ/४ या मिळकतींच्या हद्दीखुणा कायम केल्यास वादी व प्रतिवादी यांचे दरम्यानचे वादाचे पुर्णपणे उकल होणार आहे व दाव्याचा वाद संपुष्ठात येणार आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे सदरच्या दाव्याचा योग्य निर्णय होणेकामी कोर्ट कमीशनर म्हणुन अधिक्षक, भुमि अभिलेख, मोहोळ यांची नेमणुक करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.२ यांनी वादीचे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन वादीचा प्रस्तुतचा अर्ज कायद्याने चालू शकत नसल्याचे सांगितले आहे. प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ यांनी यापुर्वी मोजणी केलेली आहे व सदर मोजणीचा नकाशा प्रतिवादी दाखल करण्यास तयार आहे. तसेच वादीचा अर्ज मंजूर झाल्यास मोजणीची फी वादीला भरण्याबाबत आदेश व्हावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी वादीचे प्रस्तुत अर्जास नि.३२ वर म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी यांनी वादीचा प्रस्तुचा अर्ज मान्य व कबूल नसल्याचे सांगितले आहे. प्रतिवादी यांचे पुढे असे कथन की, वादीने प्रस्तुतचा अर्ज जाणीवपुर्वक प्रतिवादींना त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल केला आहे. वादीने पुरावा तयार करण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा मोजणी अर्ज दाखल केला आहे. सबब, वरील सर्व कारणास्तव प्रतिवादींनी वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले.

०६. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हा निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतींच्या हद्दीखुणाबाबत वाद उपस्थित आहे. प्रस्तुतचा अर्ज हा त्यात नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकतीतील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करण्याची विनंती करण्याकरीता दाखल केला आहे. परंतु सदर अर्जास प्रतिवादी यांनी आक्षेप घेवून वादीचा प्रस्तुतचा अर्ज प्रकरण कायद्याने चालू शकत नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी सदर मिळकतीची यापुर्वी मोजणी केल्याचे व तसा मोजणी नकाशा दाखल करण्यास तयार असल्याचे कथन केले आहे. परंतु, अभिलेखाचे अवलोकन करता प्रतिवादी क्र.२ यांनी सदर मिळकतीच्या मोजणीचा नकाशा दाखल केला नसल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यात मोजणीबाबतची फी वादीला भरणेबाबत आदेश व्हावा अशी देखील विनंती केली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यास पात्र असल्याबाबत कोणताही सबळ व ठोस म्हणणे सादर केलेले नाही. तसेच सदर मोजणीबाबतची फी वादीने भरल्याबाबतचे आदेश केल्यास प्रतिवादीस देखील हरकत नसल्याचे दिसून येते.

०७. एकंदरीत दाव्यातील वादाचा मुद्दा विचारात घेता दावा मिळकतीच्या हद्दीखुणाबबात दावा मिळकतीची मोजणी केल्यास वादाचे निराकरण करणे सोयीचे ठरणारे आहे. त्यामुळे गट क्र.७४०/२/अ/२, ७४०/२/अ/३, ७४०/२/अ/४, ७४०/२/अ/२ ७४०/२/अ/३ आणि ७४०/२/अ/४ या मिळकतींची मोजणी होवून हद्दीखुणा कायम झाल्यास वादी व प्रतिवादी

यांचे दरम्यान वादाची पुर्णपणे उकल होणार आहे. एकंदरीत दावा मिळकतीबाबत अचुक मोजमापे व नकाशा अभिलेखावर येणे आवश्यक ठरते. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. एकुणच दावा मिळकतीबाबतची कथने पाहता त्याबाबतची सद्यस्थिती समोर येणे आवश्यक आहे. दावा मिळकतीची मोजणी केल्यास दोन्ही पक्षकारांमधील वाद मिटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे दावा मिळकतीसंदर्भातील भविष्यातील वाद टाळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे योग्य वाटते. सबब, पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येते.

## **आ दे श**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. उप–अधिक्षक, भूमी अभिलेख, मोहोळ यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथील क्र.७४०/२/अ/२, ७४०/२/अ/३, ७४०/२/अ/४ या मिळकतींची मोजणी होवून गट क्र.७४०/२/अ/२, ७४०/२/अ/३ व ७४०/२/अ/४ या मिळकतीच्या हद्दीखुणा कायम करुन मोजमापासह नकाशा नमुद करुन मोजणीबाबतच्या सविस्तर अहवालासह नकाशा दि.२७/०१/२०२५ रोजी अथवा तत्पूर्वी दाखल करावा.

४. मोजणीसाठीची संपुर्ण फी वादी यांनी भरावी.

५. मोजणीची फी व प्रोसेस फी जमा केल्यानंतर कमिशन पत्र पाठविण्यात यावे.

PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR

Digitally signed by PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Date: 2025.01.08 11:16:23 +0530

मोहोळ (श्रीमती पी.एस.गोवेकर)

दिनांक–०६/०१/२०२५ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मोहोळ

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S. Bakale |
| Court | : | Civil Judge Jr. Division, Mohol. |
| Date | : | 06/01/2025 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 06/01/2025 |
| Judgment Uploaded on | : | 08/01/2025 |